# बळीराम पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
# ता. किनवट, जि. नांदेड.

## इतिहास विभाग

सेमीस्टर – 5, बी.ए. तृतीय वर्ष, पेपर - 10

## विषय:- महाराष्ट्रातील समाजसुधारक आणि प्रबोधन चळवळ

मार्गदर्शक

**प्रा.अजय मारोती पाटील**

# प्रकरण –४. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे.

## जीवन परिचय.

- महर्षि विठ्ठल रामजी शिंदे यांचा जन्म कर्नाटकातील जमखिंडी येथे २३ एप्रिल १८७३ रोजी झाला. त्यांच्या वडिलांचे नाव रामजी व आईचे नाव यमुनाबाई असे होते.
- विठ्ठल रामजी शिंदे यांचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण जमखिंडीतच झाले.
- इ. स. १८९१ मध्ये ते मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाले. त्यानंतर काही काळ त्यांनी शिक्षकाची नोकरी केली.
- पुढे इ. स.१८९३ मध्ये त्यांनी उच्च शिक्षणासाठी पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजमध्ये प्रवेश घेतला.
- पुण्यातील शिक्षणक्रमात त्यांना मराठा एज्युकेशन सोसायटीचे व बडोद्याच्या सयाजीराव गायकवाड महाराजांचे साहाय्य मिळाले. पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजमधून इ. स. १८९८ मध्ये त्यांनी बी. ए. ची पदवी संपादन केली.
- महर्षी वि. रा. शिंदे यांचा मराठी, संस्कृत व इंग्रजी भाषेवर प्रभुत्व होते. फर्गुसन कॉलेजमध्ये त्यांनी बी एची पदवी मिळविली.
- महर्षी शिंदे यांना डेक्कन मराठा एज्युकेशन असोशिएशनने शिक्षणाकरीता दरमहा १०रु दिले.

# वी.रा.शिंदे यांचे शैक्षणिक कार्य

- १९०५ साली महर्षी शिंदे यांनी पुणे येथे अस्पृश्य मुलांसाठी रात्रशाळा सुरु केल्या.
- डिप्रेस्ड क्लासेस मिशनच्या वतीने महर्षि विठ्ठल शिंदे यांनी अनेक उपक्रम हाती घेतले.
- अस्पृश्यांच्या मुलांसाठी शाळा, वसतिगृहे उघडणे, अस्पृश्यांच्या वस्तीत शिवणकामाचे वर्ग चालविणे, त्यांच्या प्रबोधनासाठी व्याख्यान, कीर्तने आयोजित करणे, आजारी माणसांची शुश्रूषा करणे इत्यादी गोष्टींचा समावेश होता.
- त्यांनी या संस्थेच्या शाखा मुंबई, पुणे, सातारा, ठाणे, कोल्हापूर, अकोला इत्यादी ठिकाणी उघडल्या.
- स्त्री शिक्षणासाठी प्रयत्न.
- अस्पृश्यांचे शिक्षण.

# वी. रा. शिंदे यांचे सामाजिक कार्य

- १६ ऑक्टोंबर १९०६ वि रा शिंदे यांनी अस्पृश्यतेचे निर्मुलन करण्यासाठी "ऑल इंडिया डिप्रेस क्लास मिशन" ची स्थापना केली.
- २५ मे १९१६ रोजी पुण्यातील वसंत व्याख्यानमालेत गुन्हेगार जातीची सुधारणा या विषयावर त्यांनी चर्चासत्र चालविले होते.
- १९११ मध्ये मुरळी सोडण्याच्या पद्धतीचे विरोधामध्ये त्यांनी प्रतिबंधक परीषद बोलावली. महर्षी शिंदे यांनी मुरळी सोडणे या प्रथेचा विरोध केला.
- १९१७ मध्ये कलकत्ता येथे राष्ट्रीय सभेचे पार पडलेल्या अधिवेशनाच्या पहिल्या महीला अध्यक्ष म्हणुन अनी बेझंट यांची निवड झाली. या अधिवेशनामध्ये “अस्पृश्यता पाळु नये" असा ठराव पास करुन घेण्यामध्ये शिंदे याचे मोलाचे योगदान आहे.
- १९२० मध्ये नागपुर येथे अखिल भारतीय अस्पृश्यता निवारण परीषद बोलावली.
- इ. स. १९१० मध्ये त्यांनी जेजुरी येथे मुरळीप्रतिबंधक सभा भरवून मुरळ्यांकडे समाजाचे लक्षवेधले.

- इ. स. १९१८ मध्ये त्यांनी अखिल भारतीय अस्पृश्यता परिषद, मुंबई येथे भरविली. मुंबईच्या प्रार्थना समाजाला त्यांचे हे कार्य न रूचल्यामुळे त्यांनी राजीनामा दिला व पुढे इ. स. १९२३-२४ मध्ये ते कलकत्त्याच्या ब्राह्मो समाजात गेले.
- ब्राह्मो समाजाचे मंगळूर येथील आचार्य म्हणून काही काळ त्यांनी काम केले. इ.स. १९२८ मध्ये पुणे येथे शेतकरी परिषदेचे आयोजन करून त्यांनी येथील शेतकऱ्यांच्या समस्या सरकारपुढे मांडल्या आणि त्यांचे निवारण करण्यासंबंधी सरकारकडे आग्रह धरला. अशाच प्रकारच्या परिषदा मुंबई, तेरदाळ, जळगाव, चांदवड इत्यादी ठिकाणी आयोजित केल्या.
- इ. स. १९३० मध्ये महात्मा गांधींच्या सत्याग्रह चळवळीत ते दाखल झाले व कायदेभंगाबद्दल त्यांना ६ महिने सक्तमजुरीची शिक्षा झाली.
- इ. स. १९३३ मध्ये त्यांनी ‘भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न’ हे पुस्तक लिहिले.

# *Thank you*

# बळीराम पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
# ता. किनवट, जि. नांदेड.

## इतिहास विभाग

सेमीस्टर – 5, बी.ए. तृतीय वर्ष, पेपर - 10

## विषय:- महाराष्ट्रातील समाजसुधारक आणि प्रबोधन चळवळ


मार्गदर्शक

**प्रा.अजय मारोती पाटील**

# प्रकरण – ५. राजर्षी शाहू महाराज.

## जीवन परिचय.

- जन्म : २६ जून १८७४ (कागलच्या घाटगे घराण्यात).
- जन्मस्थळ : लक्ष्मीविलास पॅलेस, कसबा बावडा (कागलवाडी), कोल्हापूर.
- मूळ नाव : यशवंतराव
- पित्याचे नाव : जयसिंगराव ऊर्फ आबासाहेब घाटगे, आईचे नाव राधाबाई
- दत्तक विधान : १७ मार्च १८८४ (कोल्हापूरचे राजे चौथे शिवाजी महाराज यांच्या पत्नी श्रीमंत आनंदीबाईसाहेब यांनी कागलच्या घाटगे घराण्यातील यशवंतराव यांस दत्तक घेऊन त्यांचे नाव शाहू महाराज असे ठेवले.)
- शिक्षण : १८८५ ते १८८९ : या काळात राजकोट येथील राजपुत्रांसाठीच्या महाविद्यालयात शिक्षण. प्रिन्सिपल मॅकनॉटन यांच्या मार्गदर्शनाखाली राजांनी राजकोट येथील शिक्षण पूर्ण केले.
- १८९० ते १८९४ : महाराजांनी धारवाड येथे सर एस. एम. फ्रेजर यांच्या मार्गदर्शनाखाली इंग्रजी भाषा, राज्य कारभार व जागतिक इतिहास आदी विषयांचे परिपूर्ण अध्ययन केले.
- विवाह : १ एप्रिल १८९१ रोजी बडोद्याचे गुणाजीपंत खानविलकर यांची कन्या श्रीमंत लक्ष्मीबाई साहेब यांच्याशी शाहू महाराजांचा विवाह.
- राज्याभिषेक : २ एप्रिल १८९४ रोजी वयाच्या २० व्या वर्षी राजे कोल्हापूर संस्थानाचे कायदेशीर वारसदार बनले. शाहू महाराजांचा राज्याभिषेक समारंभ मुंबईचे तत्कालीन गव्हर्नर लॉर्ड हॅरिस यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न.

# शाहू महाराजांचे शैक्षणिक कार्य.

- ११ जानेवारी १९११ : कोल्हापुरात सत्यशोधक समाजाची शाखा स्थापन केली.
- १९११ : संस्थानात १५ टक्के विद्‍यार्थ्यांना नादारीची घोषणा.
- १९१३ : कोल्हापुरात सत्यशोधक समाज शाळा सुरू.
- २५ जुलै १९१७ : च्या वटहुकूमाने संस्थानात प्राथमिक शिक्षण सक्तीचे करण्यात आले. सक्तीच्या शिक्षणाची पहिली शाळा संस्थानात चिंपरीपेटा येथे सुरू केली.
- १९१८ ला राजाराम कॉलेज (कोल्हापूर) आर्य समाजाकडे हस्तांतरीत केले. लष्करी शिक्षणासाठी संस्थानात इन्फंट्री स्कूलची स्थापना केली.
- १९१२ : पाटील शाळांची स्थापना.
- १९१८ : संस्थानात तलाठी शाळांची स्थापना.
- २५ जून १९१८ : संस्थानातील पारंपरिक कुळकर्णी वतने बंद करून त्या जागी पगारी तलाठ्यांची नेमणूक.
- २९ जुलै १९१८ : तलाठी हे पद कायमस्वरूपी केले.

# विविध जातीधर्माच्या विद्यार्थ्यांसाठी राजर्षी शाहू महाराजांनी स्थापन केलेली वसतीगृहे.

- १८९६ ते १९२१ या काळात राजांनी कोल्हापुरात सर्व जाती-जमातींच्या विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र अशी सुमारे २० वसतीगृहे स्थापन केली. यापैकी प्रमुख वसतीगृहे पुढीलप्रमाणे,
  1. राजाराम होस्टेल (१९०१)
  2. व्हिक्टोरिया मराठा बोर्डिंग (१९०१)
  3. वीरशैव लिंगायत बोर्डिंग (१९०६)
  4. मुस्लीम बोर्डिंग (१९०६)
  5. मिस क्लार्क होस्टेल (१९०८)
  6. दैवज्ञ बौर्डिंग (१९०८)
  7. नामदेव बोर्डिंग (१९११)
  8. सरस्वतीबाई गौड सारस्वत बोर्डिंग (१९१५)
  9. प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग (१९२०).

# शाहू महाराजांचे सामाजिक कार्य.

- २६ जुलै १९०२ : शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानात मागासवर्गीयांसाठी नोकरीत ५० टक्के जागा राखीव ठेवल्या.
- १९१८ साली कोल्हापूर संस्थानातील महार वतने रद्द करून त्या जमिनी अस्पृश्यांच्या नावे केल्या.
- मार्च १९१८ : बलुतेदारी पद्धती बंद केली.
- जुलै १९१७ : पुनर्विवाह व विधवा विवाहास मान्यता देणारा कायदा संस्थानात संमत.
- फेब्रुवारी १९१८ : आंतरजातीय विवाहास मान्यता देणारा कायदा संस्थानात संमत.
- स्वतःच्या घराण्यातील मलगी (चुलत बहीण) इंदोरच्या होळकर या धनगर घराण्याची सून बनविली.
- १९१९ : स्त्रियांना क्रूरपणे वागविण्यास प्रतिबंध करणारा कायदा संमत.
- १९२० : संस्थानात घटस्फोटाचा कायदा संमत केला.

# *Thank you*